**वादींतर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी शपथेवर पुन्हा सुरु** -

**०९.** मी, रामचंद्र बाळकृष्ण बागवे, वय ४२ वर्षे, धंदा - शेती, रा. कुंदे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, सत्यप्रतिज्ञेवर सांगतो की, सदरचे पुरावा प्रतिज्ञापत्र मी दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर माझे सांगणेप्रमाणेच लिहीलेला आहे. तो खरा व बरोबर आहे. त्यासाठी मी त्यावर सही केलेली आहे.

**१०.** उभय पक्षकारांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींच्या तज्ञ वकीलांनी सदर दस्तऐवजांवर सहीशिक्के नाहीत, तसेच पुराव्यात शाबीत झालेले नाहीत, या मुद्यांवर आक्षेप नोंदविला. पुरावा प्रतिज्ञापत्र पाहता सार्वजनिक दस्तऐवजांना निशाणी देण्यास हरकत नाही, तसेच उर्वरीत दस्तऐवज सुध्दा सिध्द झालेले आहेत, म्हणून त्या दस्तऐवजांना खालीलप्रमाणे निशाणी देण्यात आल्या.

**१.** ग्रामपंचायत घर क्रमांक १५३-अ आणि १५३-ब च्या करआकारणी पत्राची सहीशिक्क्याची साक्षांकित प्रत - **<u>नि. ६६</u>.**

**२.** घर क्रमांक १०० च्या घरपत्रकाच्या उता-याची सहीशिक्क्याची नक्कल - **<u>नि. ६७</u>.**

**३.** घर क्रमांक १५३ च्या घरपत्रकाच्या उता-याची सहीशिक्क्याची नक्कल - **<u>नि. ६८</u>.**

**४.** सन १९९१-९२ ते १९९४-९५ सालची घर क्रमांक १५३ ची घरपत्रकाच्या उता-याची सहीशिक्क्याची नक्कल - **<u>नि. ६९</u>.**

**५.** दस्ताच्या पावत्या, एकूण पस्तीस - **<u>नि. ७०</u>.**

**६.** कर पावत्या, एकूण सोळा - **<u>नि. ७१</u>.**

**७.** वीज बिल भरल्याच्या पावत्या, एकूण पस्तीस- **<u>नि. ७२</u>.**

**८.** दि. २४/०४/२००८ व दि. २१/०४/२००६ रोजीच्या लाईट बिल भरल्याच्या पावत्या, एकूण दोन - **<u>नि. ७३</u>.**

**९.** रामचंद्र आप्पा बागवे यांचे रेशनकार्ड - **<u>नि. ७४</u>.**

**१०.** दि. ०४/०१/१९४४ रोजीचे मूळ खरेदीखत - **<u>नि. ७५</u>.**

**११.** फेरफार नोंद क्रमांक १९८ ची सहीशिक्क्याची साक्षांकित प्रत - **<u>नि. ७६</u>.**

**१२.** हक्कपत्रकाची सहीशिक्क्याची साक्षांकित प्रत - **<u>नि. ७७</u>.**

**१३.** फेरफार नोंद क्रमांक १३६१ ची सहीशिक्क्याची साक्षांकित प्रत - **<u>नि. ७८</u>.**

**१४.** नमुना नंबर ८अ ची सहीशिक्क्याची साक्षांकित प्रत - **<u>नि. ७९</u>.**

**१५.** आकारफोडपत्रकाची सहीशिक्क्याची साक्षांकित प्रत - **<u>नि. ८०</u>.**

( *प्रतिवादींच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब*)

**समक्ष -**

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**कुडाळ**
**दिनांक : १९ /०४ /२०१७**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**कुडाळ**
**दिनांक : १९ /०४ /२०१७**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**प्रतिवादींना मुदत नाकारली** - सबब उलटतपास नाही.

**फेरतपास** - नाही.

**समक्ष** -

सही/-

कुडाळ (कोमलसिंग राजपूत)

दिनांक : २२ /११ /२०१७ दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-

कुडाळ (कोमलसिंग राजपूत)

दिनांक : २२ /११ /२०१७ दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

**<u>निशाणी ८८ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु</u> -**

**<u>सर्व प्रतिवादीं तर्फे श्री. एस्. एस्. सावंत, वकील</u> -**

**११.** मी दाव्यातील एकाही प्रतिवादीला ओळखत नाही. प्रतिवादींची नांवे मी दाव्यात फेरफार नोंदींच्या आधारे नमूद केलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींशी माझी आजपावेतो कधीही भेट झालेली नाही. न्यायालयात खोटी साक्ष दिल्यास त्यासाठी शिक्षा होवू शकते, याची माहिती मला आहे. पुरावा प्रतिज्ञापत्र मी स्वतः माझे वकीलांच्या कार्यालयात तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, पुरावा प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्रमांक ६ मधील दावा दाखल करणेस झालेल्या कारणासंबंधीचा मजकूर खोटा आहे. प्रतिवादींचे पत्ते मला आमचे शेजारी कदम नांवाचा इसम राहतो त्याने सांगितले.

**१२.** प्रतिवादी क्र. २ , उपर्णा, प्रतिवादी क्र. १ ची वहिणी आहे. प्रतिवादी क्र. ३ , ४ आणि प्रतिवादी क्र. १ यांचे दरम्यान असलेल्या नातेसंबंधांची मला माहिती नाही. प्रतिवादी क्र. ३ , सुरेश, तसेच प्रतिवादी क्र. ४ , सुमती, हे प्रतिवादी क्र. १ , बाबाजी, याचे अनुक्रमे भाउ व आई आहेत, असे म्हणणे बरोबर होईल. माझे आजोबांचे पूर्ण नांव रामचंद्र अप्पाजी बागवे असे होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ , बाबाजी, याच्या वडिलांचे संपूर्ण नांव लक्ष्मण अप्पाजी बागवे असे होते.

**१३.** प्रतिवादी क्र. ३ , सुरेश, खार (पश्चिम), मुंबई, येथे राहतो, याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर तो तेथून साईप्रेरणा को. ऑप. हौ. सोसायटी, व्ही. विंग, २०३, खारेगांव, कळवा (पश्चिम), जि. ठाणे, येथे राहणेस गेला. दाव्याच्या समन्सची बजावणी सुरेश यास याच पत्त्यावर झालेली आहे कारण तो तेथेच राहतो. सोनू जगन्नाथ घाडीगांवकर आमच्याच गांवात राहतो. तो माझे माहितीचा इसम आहे. उज्ज्वला लक्ष्मण परब त्याच्या शेजारी राहते व ती लग्न करुन सासरी गेली, याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, रामचंद्र महादेव परब हा इसम माझेच गांवातील आहे. सुहासिनी रामचंद्र बागवे माझी पत्नी आहे. सोनू जगन्नाथ घाडीगांवकर यास मीना नांवाची मुलगी आहे.

**१४.** कुंदे गांवात खंदारे आडनांवाचे लोक आहेत. प्रतिवादी क्र. ३ , सुरेश, याच्या बहिणीचे लग्न कुंदे गांवातील खंदारे कुटुंबियात झाले आहे, याची माहिती मला नाही. राधाबाई बाळकृष्ण बागवे माझी आई आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींच्या नांवे कुंदे गांवात घर किंवा जमीन नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ , २ आणि ४ , अनुक्रमे बाबाजी, उपर्णा आणि सुमती, मला

दि.१५/०२/२०१४ रोजी भेटले नाहीत. दाव्यास नमूद कारण दि.१५/०२/२०१४ रोजी घडल्याचे नमूद आहे.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात नमूद इमल्याचा क्रमांक सन १९७८-७९ साली घर क्रमांक २३५ असा होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर फेर आकारणीमध्ये त्याचा क्रमांक २०७ आणि त्यानंतर १५३ असा झाला.

**प्रश्न** - सध्या घर क्रमांक १५३ ची दुरुस्ती केलेली आहे?

**उत्तर** - होय, सन २००५ मध्ये मांगर बांधलेला आहे.

हे म्हणणे खरे नाही की, त्यासंबंधीचा वाद महात्मा गांधी तंटामुक्त गांवसमितीकडे सुध्दा गेला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या समितीकडे मी त्या इमल्यापैकी एक खोली प्रतिवादींना राहणेस देणार, असे कबुल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मागील २०-२२ वर्षांपासून प्रतिवादी व आमचे दरम्यानचे संबंध तणावाचे होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २५/११/१९९७ रोजी माझी आई राधाबाई बाळकृष्ण बागवे हिने प्रतिवादींना ॲड. श्री. संग्राम देसाई यांचेमार्फत नोटीस पाठविली होती. माझे व ॲड. संग्राम देसाई यांचे दरम्यान कोणताही वैयक्तिक वाद नाही. *आता साक्षीदारास यादी निशाणी ८५ वर अ.क्र. १ नुसार हजर केलेली नोटीस दाखविली.*

**प्रश्न** - ती नोटीस राधाबाई बाळकृष्ण बागवे हिने बाबाजी लक्ष्मण बागवे यास पाठविलेली दिसते?

**उत्तर** - ती खोटी आहे.

*साक्षीदारास वरील प्रश्न पुन्हा-पुन्हा विचारला, परंतु साक्षीदार त्या प्रश्नास उत्तर न देता त्या नोटीसीत नमूद नांव राधाबाई बाळकृष्ण बागवे त्याच्या आईचे नांव असल्याचे सांगतो, परंतु ती नोटीस खोटी आहे असे पुन्हा-पुन्हा सांगतो.*

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, कुंदे, ता. कुडाळ, येथे राधाबाई बाळकृष्ण बागवे आणि रामचंद्र बाळकृष्ण बागवे नांवाचे आम्हीच लोक आहोत. *आता साक्षीदारास यादी निशाणी ८५ सोबत अ.क्र. २ अन्वये हजर केलेली मनिऑर्डरची पावती दाखविली.* ती पावती प्रतिवादी सुरेश याने रामचंद्र बाळकृष्ण बागवे यास पाठविल्याची व मनिऑर्डर पोहोच झाल्याची दिसते. त्यावर साक्षीदार म्हणून सोनू जगन्नाथ घाडीगांवकर याचे सुध्दा नांव दिसते. *साक्षीदार सांगतो की, तशी कोणतीही मनिऑर्डर आम्ही स्विकारलेली नाही. आता साक्षीदारास यादी निशाणी ८५ सोबत अ.क्र. ३ अन्वये हजर केलेली मनिऑर्डरची पावती दाखविली.* हे म्हणणे खरे नाही की, ती पावती माझी आई राधाबाई बागवे हिला

प्रतिवादी सुरेश याने साईप्रेरणा को.ऑप.हौ.सोसायटी, व्ही विंग, २०३, खारेगांव, कळवा (पश्चिम), जि. ठाणे, येथून पाठविलेली आहे. *आता साक्षीदारास यादी निशाणी ८५ सोबत अ.क्र. ४ अन्वये हजर केलेली मनिऑर्डरची पावती दाखविली.* हे म्हणणे खरे नाही की, ती पावती माझे वडिल बाळकृष्ण बागवे यांना प्रतिवादी सुरेश याने खारदांडा, खार, मुंबई, येथून पाठविलेली आहे. *आता साक्षीदारास यादी निशाणी ८५ सोबत अ.क्र. ५ अन्वये हजर केलेली मनिऑर्डरची पावती दाखविली.* हे म्हणणे खरे नाही की, ती पावती माझी आई राधाबाई बागवे हिला प्रतिवादी सुरेश याने खार, मुंबई, येथून पाठविलेली आहे. *आता साक्षीदारास यादी निशाणी ८५ सोबत अ.क्र. ६ अन्वये हजर केलेली मनिऑर्डरची पावती दाखविली.* हे म्हणणे खरे नाही की, ती पावती माझी आई राधाबाई बागवे हिला प्रतिवादी सुरेश याने खार, मुंबई, येथून पाठविलेली आहे. *आता साक्षीदारास यादी निशाणी ८५ सोबत अ.क्र. ७ अन्वये हजर केलेली मनिऑर्डरची पावती दाखविली.* हे म्हणणे खरे नाही की, ती पावती माझे वडिल बाळकृष्ण बागवे यांना प्रतिवादी सुरेश याने घाटकोपर, मुंबई, येथून पाठविलेली आहे. *आता साक्षीदारास यादी निशाणी ८५ सोबत अ.क्र. ८ अन्वये हजर केलेली मनिऑर्डरची पावती दाखविली.* हे म्हणणे खरे नाही की, ती पावती माझी आई राधाबाई बागवे हिला प्रतिवादी सुरेश याने खार, मुंबई, येथून पाठविलेली आहे. वरील सर्व पावत्यांवर आमची नांवे का आली, याचे मला काहीही कारण सांगता येणार नाही.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, वादातीत घराचा गृहप्रवेश सन २००५ साली अक्षयतृतियेच्या दिवशी झाला. *आता साक्षीदारास प्रतिवादीने हजर केलेल्या अल्बममधील छायाचित्रं दाखविले.* त्यापैकी अ.क्र. १ च्या छायाचित्रातील मांगर घर नंबर १५३ चाच मांगर आहे. हे म्हणणे खरे नाही की, छायाचित्र क्र. २ मधील पूजेस बसलेले दाम्पत्य माझे भाउ व वहिणी आहेत. छायाचित्र क्र. ३ मधील घर, घर क्रमांक १५३ आहे. त्यातील उभे दाम्पत्य प्रतिवादींची मावशी आहे, याची माहिती मला नाही. छायाचित्र क्र. ४ मधील खोली घर क्रमांक १५३ पैकीच आहे. त्या छायाचित्रात माझा भाउ रमाकांत व त्याची पत्नी आहे. इतर लोक प्रतिवादी क्र. १ व त्याची पत्नी आहेत किंवा कसे, याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ती छायाचित्रं घर क्रमांक १५३ मध्ये धार्मिक विधी झाला त्याची आहेत. ते छायाचित्र कोणत्या धार्मिक विधीचे आहे, हे मला सांगता येणार नाही.

**१८.** छायाचित्र क्र. ५ देखील त्याच घराचे आहे. त्या छायाचित्रातील व्यक्तिंमध्ये माझा मुलगा सौरभ तसेच भाउ रमाकांत व त्याची पत्नी तसेच इतर लोक आहेत. छायाचित्र क्र. ६ घर क्रमांक १५३

चेच आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या अल्बममधील उर्वरीत सर्व छायाचित्र सुध्दा घर क्रमांक १५३ चीच आहेत. त्या अल्बमला एकत्रितपणे **<u>निशाणी ९३</u>** देण्यात आली. *वादीच्या तज्ञ वकीलांनी संपूर्ण अल्बमला निशाणी देण्यास, काही छायाचित्र साक्षीदाराने नाकारली आहेत, या मुद्यावर आक्षेप नोंदविला. निशाणी देणे आणि दस्तऐवज सिध्द होणे या दोन्ही प्रक्रियांमध्ये भिन्नता आहे. केवळ निशाणी दिली म्हणून संपूर्ण दस्तऐवज पुराव्यात वाचलाच जाईल असे नाही. जो दस्तऐवज शाबीत झाला आहे तोच पुराव्यात वाचला जाईल, त्यामुळे आक्षेप नाकारणेत आला.*

**१९.** *आता साक्षीदारास निशाणी ९० सोबत अ.क्र. १ अन्वये हजर केलेली मनिऑर्डरची पावती दाखविली.* हे म्हणणे खरे नाही की, ती मनिऑर्डर माझी आई राधाबाई बागवे हिला प्रतिवादी क्र. ३, सुरेश, याने खार, मुंबई, येथून पाठविली होती. त्या पावतीत माझे आईचा उल्लेख का आला, याचे मला कारण सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती माझे आजोबा रामचंद्र अप्पा बागवे यांच्याच आहेत व त्या मिळकतींशी प्रतिवादींचा कोणताही संबंध नाही, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ जमिनीत हक्क द्यावा लागतो म्हणून मी प्रतिवादीं विरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**<u>फेरतपास</u>** - नाही.

**समक्ष -**

सही/-
**कुडाळ** **(कोमलसिंग राजपूत)**
**दिनांक : ०६ /०१ /२०१८** **दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-

**कुडाळ** **(कोमलसिंग राजपूत)**
**दिनांक : ०६ /०१ /२०१८** **दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**